नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २६० Issue - 260 | वार सोमवार दि. ९ फेब्रुवारी २०२६ Blow- Monday Date 9 February 2026 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# कर्नाटकात मोठा विमान अपघात

## आकाशातून जाणारं विमान अचानक शेतात कोसळलं

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बंगळुरु : देशात विमान अपघाताच्या घटना सातत्याने समोर येत आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताची घटना ताजी असतानाच आता कर्नाटकातून विमान अपघाताची बातमी समोर येत आहे. कर्नाटकात विमान अपघाताची दुर्घटना घडली आहे. कर्नाटकच्या विजयपुरा जिल्ह्यात हा विमान अपघात झाला आहे. सुदैवाने या विमानातील दोनही जण सुरक्षित आहेत. त्यांना दुखापत झाल्याची माहिती आहे. ते जखमी झाल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे. अत्यंत थरारक असा हा अपघात होता. विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने हे विमान थेट शेतात कोसळलं. यानंतर परिसरात मोठी खळबळ उडाली.



मिळालेल्या माहितीनुसार, एका खासगी प्रशिक्षणार्थी विमानाचा हा अपघात होता. रेड बर्ड एव्हिशनच्या मालकीचं हे विमान होतं. हे प्रशिक्षणार्थी विमान हवेतून आपल्या मार्गाला जात असताना अचानक क्रॅश झालं आणि विजयपुरा जिल्ह्यातील मंगलोर या गावात कोसळलं. या अपघातात विमानातील दोन्ही पायलट जखमी झाले आहेत.

हे विमान कलबुर्गी येथून बेळगावच्या दिशेला जात होतं. पण उड्डाण करतानाच विमानाच्या इंजिनमध्ये तांत्रिक बिघाड झाला. त्यामुळे ते अनियंत्रित होऊन मंगलौर गावाजवळ शेतात जावून पडलं, असा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. विमान जमिनीवर कोसळल्यानंतर परिसरात मोठी खळबळ उडाली आणि स्थानिक नागरीक तातडीने मदतीसाठी घटनास्थळाकडे धावले.

विमानात एक कॅप्टन आणि दुसरा ट्रॅनी पायलट होता. जमिनीत कोसळताच विमान पलटी झालं. तसेच त्याच्या पुढच्या भागाचे तुकडे झाले. या अपघातात विमानातील दोन्ही वैमानिकांना गंभीर दुखापत झाली. घटनास्थळी पोहोचलेल्या प्रत्यक्षदर्शी आणि पोलिसांनी दोन्ही जखमींना रुग्णवाहिकेच्या मदतीने तातडीने रुग्णालयात नेलं. दोन्ही वैमानिकांवर सध्या रुग्णालयात उपचार सुरु आहेत. दरम्यान, घटना घडल्यानंतर पोलिसांना या घटनेची माहिती देण्यात आली होती. घटनेची माहिती मिळताच बाबलेश्वर पोलीस ठाण्याची टीम घटनास्थळी दाखल झाली. पोलिसांनी पूर्ण परिसराला घेरलं आणि तपासाला सुरुवात केली. विमानाचा अपघात नेमका कशामुळे झाला असावा? याचा तपास पोलिसांनी केला. यावेळी इंजिनमध्ये बिघाड झाल्याने हा अपघात झाल्याच्या निष्कर्षापर्यंत पोलीस पोहोचले.

विमानाच्या उड्डाणावेळी त्या विमानात कोणता तांत्रिक बिघाड आहे का? याची तपासणी झाली नव्हती का? याचा तपास आता पोलीस करत आहेत. विमानात अचानक झालेल्या तांत्रिक बिघाडाचं कारण समजून घेण्यासाठी तज्ज्ञांची मदत घेतली जात आहे. या अपघातामुळे ट्रेनिंग एअरक्राफ्टच्या सुरक्षेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. दरम्यान, नागरी विमान उड्डाण विभाग आणि पोलिसांकडून या घटनेचा आता विस्तृत रिपोर्ट मागवण्यात आला आहे. अशा घटना वारंवार घडू नये यासाठी विस्तृत रिपोर्ट मागवण्यात आल्याची माहिती आहे.

# सोलापुरात चक्क ढाब्यावर आढळल्या ईव्हीएम मशीन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूरच्या मोहोळमध्ये ईव्हीएम मशीन चक्क धाब्यावर (हॉटेल) आढळून आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. काही लोक या ईव्हीएम मशीन घेऊन जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार उमेश पाटील यांनी केला आहे. दरम्यान हा प्रकार उघडकीस आल्यानंतर प्रशासकीय यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. मोहोळ शहरानजीक असलेल्या हॉटेल स्वराज्य येथे या ईव्हीएममशीन घेऊन जाताना पकडल्याचा दावा, करण्यात येतोय. दरम्यान यावेळी २ सीलबंद एतच् मशीन देखील आढळून आल्याची माहिती आहे.



मोहोळ मतदारसंघात जिल्हा परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरु असताना मध्यरात्रीच्या सुमारास एक वेगळाच प्रकार घडला आहे. मोहोळ शहराजवळील एका हॉटेल आणि बारच्या परिसरात ईव्हीएम मशिन आढळून आल्याने लोकशाहीच्या या उत्सवात खळबळ उडाली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार उमेश पाटील यांनी हा प्रकार उघडकीस आणला असून त्यांनी या संबंधित व्यक्तींना जाब विचारलाय. घटनेची माहिती मिळताच निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सीमा होळकर आणि पोलिस निरीक्षक हेमंत शेंडगे हे देखील घटनास्थळी दाखल झालेत. दरम्यान, याबाबत प्रशासनाला विचारले असता, या मशीन्स 'राखीव'स्वरूपातील होत्या असं स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. मात्र उमेश पाटील यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली असून, मतदानाच्या प्रक्रियेत पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. दरम्यान मोहोळचे तहसीलदार आणि सहायक निवडणुक निर्णय अधिकारी सचिन मुळीक यांच्या माहितीनुसार 'लोकांनी अडवलेल्या मशीन ह्या राखीव मशीन आहेत. त्यांचा वापर मतदानासाठी झालेला नाही. अद्याप ही या मशीन सिलबंद स्वरूपातच आहेत. मतदान झालेल्या सर्व मशीन रात्री १०.३० पर्यंत स्ट्राँग रूममध्ये जमा करून स्ट्राँग रूम सील करण्यात आलीय.' अशी माहिती मोहोळचे तहसीलदार सचिन मुळीक यांनी दिलीय. सोलापूर जिल्ह्यात जिल्हापरिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत सरासरी ६५.९० टक्के मतदान झालंय. जिल्ह्यात सांगोला तालुक्यात सर्वाधिक ७०.५५ टक्के मतदान झालं आहे. तर दक्षिण सोलापूर तालुक्यात सर्वात कमी ५८.३९ टक्के मतदानाची नोंद करण्यात आली आहे. मागील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत ६६.९६ टक्के इतके मतदान झाले होते. दरम्यान, मागील निवडणुकीच्या तुलनेत १ टक्याने मतदान घसरले आहे.

# सर्वात मोठी कारवाई, आमदार विलास भुमरे यांच्या मुलाच्या बोटाला शाई लावणं भोवलं, तीन कर्मचारी निलंबित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

छत्रपती संभाजीनगर : पैठण मतदारसंघाचे आमदार विलास भुमरे यांच्या अल्पवयीन मुलाला मतदान केंद्रात बोटाला शाई लावल्याचा धक्कादायक प्रकार काल उघडकीस आला होता. या प्रकरणाची जिल्हा प्रशासनाने अत्यंत गंभीर दखल घेतली असून, निवडणूक कामात हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवत जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी पाचोड येथील मतदान केंद्रावरील तीन कर्मचाऱ्यांवर निलंबनाचा बडगा उगारण्यात आला आहे. दिलीप नरवडे (केंद्र प्रमुख) ज्यांच्या देखरेखीखाली हा प्रकार घडला, तसेच मतदान अधिकारी आणि अन्य एक कर्मचारी ज्यांनी अल्पवयीन मुलांच्या बोटाला शाई लावली यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विलास भुमरे यांच्या मुलाला शाई लावणाऱ्या संगीता केदार यांचं निलंबन करण्यात आलं आहे. यासोबतच होम हार्ड रेणूका बोंबले यांच्यावरही निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. हे तीनही कर्मचारी पैठण तालुक्याचे असल्याची माहिती आहे. त्यामुळे ही मोठी कारवाई असल्याची चर्चा आता जिल्ह्यात होत आहे.

दरम्यान या प्रकरणी अधिक माहिती अशी की, शनिवारी (७ फेब्रुवारी) मतदानादरम्यान पाचोड येथील एका केंद्रावर आमदार विलास भुमरे यांच्या अल्पवयीन मुलांच्या बोटाला शाई लावल्याचा प्रकार समोर आला होता. या घटनेचे व्हिडिओ आणि फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते.




अल्पवयीन मुलांना केंद्रात प्रवेश कसा मिळाला आणि त्यांच्या बोटाला शाई लावून नियमांचे उल्लंघन का झाले? याबाबत जिल्हा प्रशासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दिलीप स्वामी यांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी केली. या चौकशीत निवडणूक कर्तव्यात कसूर केल्याचे स्पष्ट झाल्याने आज निलंबनाचे आदेश निर्गमित करण्यात आले. निवडणूक प्रक्रियेत कोणताही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा सज्जड दमच या कारवाईतून जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे. या कारवाईमुळे राजकीय वर्तुळात आणि शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.



# त्रिवेणी संगमावर दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अस्थींचे विसर्जन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रयागराज: महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजित पवार यांच्या अस्थींचे आज उत्तरप्रदेशातील पावन प्रयागराज येथे गंगा, यमुना आणि सरस्वती यांच्या त्रिवेणी संगमावर विधीवत विसर्जन करण्यात आले. अत्यंत साध्या पण भावपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या विधीवेळी पवार कुटुंबिय आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

अजितदादांच्या निधनानंतर राष्ट्रवादी परिवारातर्फे काश्मीर ते कन्याकुमारी अशी देशव्यापी 'अस्थि-कलश यात्रा' काढण्यात आली होती. हरिद्वार येथून सुरू झालेल्या या राष्ट्रव्यापी यात्रेची सांगता आज प्रयागराजमध्ये झाली. या यात्रेच्या माध्यमातून देशाच्या विविध भागांतील नागरिकांनी लाडक्या नेत्याला आदरांजली वाहिली.

अजितदादांचे चिरंजीव, युवानेते जय पवार यांनी याप्रसंगी उपस्थित राहून पुत्राचे कर्तव्य पार पाडले. त्रिवेणी संगमाच्या व्हीआयपी घाटावर पुरोहितांच्या मार्गदर्शनाखाली अस्थि-कलशाचे विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर अत्यंत भावूक वातावरणात जय पवार यांनी पवित्र अस्थी संगमाच्या प्रवाहामध्ये अर्पण केल्या. आपल्या लाडक्या नेत्याला अखेरचा निरोप देताना उपस्थित कार्यकर्त्यांचे डोळे पाणावले होते.

**मुलगा जय पवारांनी दिला विधीवत निरोप**

हा सोहळा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष धीरज शर्मा यांच्या नेतृत्वाखाली पार पडला. यावेळी राष्ट्रीय सचिव धनंजय शर्मा, उत्तरप्रदेश राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हरिश्चंद्र सिंग, तसेच उत्तरप्रदेशातील भाजपचे काही प्रमुख नेते आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते. संगम घाटावर उपस्थित असलेल्या स्थानिक नागरिकांनीही अजितदादांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्याबद्दलचा आदर व्यक्त केला. या विसर्जनासह अजितदादांच्या अस्थि-कलश यात्रेचा हा प्रवास आज पवित्र संगमाच्या तीरावर शांत झाला.

दरम्यान, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताच्या प्राथमिक चौकशीचा अहवाल लवकरच सरकारकडे सादर होणार आहे. विमान अपघात तपास आयोग आणि डीजीसीएचा तपास सुरू आहे. ब्लॅक बॉक्स सापडला असून डेटा तपासून प्राथमिक अहवाल प्रसिद्ध केला जाणार असल्याची माहिती राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी शनिवारी दिली. त्यामुळे आता पुढे काय होते हे पाहणेही महत्त्वाचे आहे.

**सरसंघचालक मोहन भागवतांची स्पष्टोक्ती** | **अखंड भारत आणि २०४७ चे स्वप्न**

# आम्ही 'बॅक सीट ड्रायव्हिंग' करत नाही. जे लोक सरकारमध्ये आहेत तेच सरकार चालवतात, आम्ही नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बांगलादेशात अजूनही सव्वा कोटी हिंदू आहेत. जर ते एकत्र आले, तर ते स्वतःच्या सुरक्षेसाठी तिथल्या राजकारणाचा उपयोग करू शकतात. सुदैवाने, यावेळी त्यांनी 'पळणार नाही, तिथेच राहून लढू' असा निर्णय घेतला आहे. तिथल्या हिंदूंना बळ देण्यासाठी आम्ही आमच्या मर्यादेत राहून जे काही शक्य आहे ते सर्व करू, याची खात्री मी देतो, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी केले. आरएसएस व्याख्यानमालेत मोहन भागवत यांनी विविध मुद्यांवर भाष्य केले.

अखंड भारत आणि २०४७ चे स्वप्न

मोहन भागवत म्हणाले की, २०४७ मध्ये भारत विभाजनाची भीती बाळगण्यापेक्षा 'अखंड भारताच्या' उदयाची कल्पना करा. जे ५०० वर्षे बादशहा करू शकले नाहीत किंवा २०० वर्षे इंग्रज करू शकले नाहीत, ते आता स्वतंत्र भारतात का होईल? हे १९४७ नाही, आता आपण खूप पुढे गेलो आहोत. भारताला तोडणारे स्वतःच तुटतील, पण भारत जोडला जाईल आणि हे आपण करून दाखवू. लोकसंख्येच्या बाबतीत तीन मुख्य कारणे असल्याचे



त्यांनी सांगितले. गेल्या तीन-चार वर्षांपासून सरकार यावर प्रयत्न करत आहे आणि ते विफल होणार नाहीत, असे आम्हाला वाटते.

मोहन भागवत म्हणाले की, आम्ही 'बॅक सीट ड्रायव्हिंग' करत नाही. जे लोक सरकारमध्ये आहेत तेच सरकार चालवतात, आम्ही नाही. आम्हाला जर काही चांगल्या आणि उपयुक्त गोष्टी माहीत झाल्या, तर आमचे स्वयंसेवक त्या तिथपर्यंत पोहोचवण्याचे काम करतात, त्यापलीकडे आम्ही जात नाही, असे त्यांनी सागंतिले.

भागवत म्हणाले की, घातपाताच्या घटना आणि वेडेपणा पूर्णपणे बंद होईल असे नाही, पण जर समाज सजग असेल, तर ९० टक्के नियंत्रण मिळवता येते. उरलेले १० टक्के देवाच्या मर्जीवर असते. समाजाची सुरक्षा आणि तयारी ही सर्वात मोठी गरज आहे. समाजात अनुशासन (शिस्त) आणि आपुलकी असेल तरच व्यवस्था पक्की राहते. आपल्याला काही देणेघेणे नाही, असा विचार न करता समाजाने सक्रिय आणि सजग राहिले पाहिजे, असे ते म्हणाले. यूकेमध्ये १ लाख हिंदूंच्या संमेलनासाठी फक्त ८० पोलीस होते, कारण तिथे स्वयंशिस्त होती. याउलट तिथल्याच फुटबॉल मॅचेसमध्ये ८ हजार पोलीस असूनही दंगली होतात, असे ते म्हणाले.

## संपादकीय....

### 'ईव्हीएम'वरून गोंधळ

मोहोळ मतदारसंघात जिल्हा परिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरु असताना मध्यरात्रीच्या सुमारास एक वेगळाच प्रकार घडला आहे. मोहोळ शहराजवळील एका हॉटेल आणि बारच्या परिसरात ईव्हीएम मशिन आढळून आल्याने लोकशाहीच्या या उत्सवात खळबळ उडाली आहे. सोलापूरच्या मोहोळमध्ये ईव्हीएम मशीन चक्क धाब्यावर (हॉटेल) आढळून आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. काही लोक या ईव्हीएम मशीन घेऊन जात असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार उमेश पाटील यांनी केला आहे. दरम्यान हा प्रकार उघडकीस आल्यानंतर प्रशासकीय यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. मोहोळ शहरानजीक असलेल्या हॉटेल स्वराज्य येथे या ईव्हीएममशीन घेऊन जाताना पकडल्याचा दावा, करण्यात येतोय. दरम्यान यावेळी २ सीलबंद ईव्हीएम मशीन देखील आढळून आल्याची माहिती आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार उमेश पाटील यांनी हा प्रकार उघडकीस आणला असून त्यांनी या संबंधित व्यक्तींना जाब विचारलाय. घटनेची माहिती मिळताच निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सीमा होळकर आणि पोलिस निरीक्षक हेमंत शेंडगे हे देखील घटनास्थळी दाखल झालेत. दरम्यान, याबाबत प्रशासनाला विचारले असता, या मशीन्स 'राखीव'स्वरूपातील होत्या असं स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. मात्र उमेश पाटील यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली असून, मतदानाच्या प्रक्रियेत पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. दरम्यान मोहोळचे तहसीलदार आणि सहायक निवडणुक निर्णय अधिकारी सचिन मुळीक यांच्या माहितीनुसार 'लोकांनी अडवलेल्या मशीन ह्या राखीव मशीन आहेत. त्यांचा वापर मतदानासाठी झालेला नाही. अद्याप ही या मशीन सिलबंद स्वरूपातच आहेत. मतदान झालेल्या सर्व मशीन रात्री १०.३० पर्यंत स्ट्राँग रूममध्ये जमा करून स्ट्राँग रूम सील करण्यात आलीय.' अशी माहिती मोहोळचे तहसीलदार सचिन मुळीक यांनी दिलीय. सोलापूर जिल्ह्यात जिल्हापरिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत सरासरी ६५.९० टक्के मतदान झालंय. जिल्ह्यात सांगोला तालुक्यात सर्वाधिक ७०.५५ टक्के मतदान झालं आहे. तर दक्षिण सोलापूर तालुक्यात सर्वात कमी ५८.३९ टक्के मतदानाची नोंद करण्यात आली आहे. मागील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीत ६६.९६ टक्के इतके मतदान झाले होते. दरम्यान, मागील निवडणुकीच्या तुलनेत १ टक्याने मतदान घसरले आहे.

# भारत-मलेशिया हे दोन्ही देश आता प्रगती आणि समृद्धीच्या दिशेचे भागीदार : पंतप्रधान मोदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज मलेशियातील क्वालालंपूर येथे एका सामुदायिक कार्यक्रमाला संबोधित केले. या स्वागतातील उत्साहातून आपल्या परस्पर सामायिक संस्कृतीमधील सुंदर विविधतेचे प्रतिबिंब उमटल्याची भावना पंतप्रधानांनी व्यक्त केली. या सामुदायिक उत्सवात सहभागी झाल्याबद्दल त्यांनी त्यांचे प्रिय मित्र पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांचे आभार मानले. पंतप्रधान अन्वर इब्राहिम आपल्याला विमान-तळावर घेण्यासाठी आले होते आणि त्यांनी स्वत:च्या गाडीतून आपल्याला या कार्यक्रमात आणले, याचा दखलपूर्ण उल्लेख त्यांनी आपल्या संबोधनात केला. यातून पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांचे भारताप्रती आणि इथल्या लोकांसाठी असलेले प्रेम आणि आदराची भावना दिसून येते, असे पंतप्रधानांनी सांगितले.

८०० पेक्षा जास्त नृत्य कलाकारांनी समन्वय राखून केलेला विक्रमी सांस्कृतिक कलाविष्कार अनेक वर्षे स्मरणात राहील असे ते म्हणाले. त्यांनी सर्व कलाकारांचे अभिनंदनही केले. पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्यासोबत, ते पंतप्रधान होण्याआधीपासूनची मैत्री आहे असे त्यांनी सांगितले. पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी सुधारणांवर दिलेला भर, त्यांची प्रखर बुद्धिमत्ता आणि २०२५ मधील आसियानच्या आयोजनातील त्यानी पार पाडलेली सक्षम अध्यक्षतेची भूमिका याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले.

गेल्या वर्षी आसियान शिखर परिषदेसाठी आपण मलेशियाला येऊ शकलो नाही याचे स्मरण त्यांनी करून दिले. त्यावेळीच आपण लवकरच मलेशियाला भेट देऊ असे आश्वासन दिले होते आणि ते आश्वासन आज पूर्ण केले आहे असे ते म्हणाले. २०२६ मधला हा आपला पहिला परदेश दौरा असल्याचे त्यांनी नमूद केले, उत्सवाच्या काळात आपण इथल्या समुदायासोबत असल्याबद्दल आनंद वाटत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. प्रत्येकाने संक्रांती, पोंगल आणि थाईपुसम अत्यंत उत्साहात साजरे केले असतील, अशी आशा त्यांनी व्यक्त केली. शिवरात्री जवळ येत आहे, त्यानंतर रमजानची सुरुवात होईल आणि नंतर हरि रायाचा सण येणार असल्याचे स्मरण त्यांनी करून दिले. सर्वांना सुख आणि उत्तम आरोग्यासाठीच्या शुभेच्छाही त्यांनी दिल्या.

मोदी म्हणाले की मलेशियात जगातली दुसऱ्या क्रमांकाची भारतीय वंशाची लोकसंख्या आहे आणि भारत-मलेशियाच्या मनाला जोडणाऱ्या खूप गोष्टी आहेत. थोड्यावेळापूर्वी त्यांनी जे प्रदर्शन पाहिले, ते हे सगळे संबंध खूप सुंदररीत्या दाखवते, असे ते म्हणाले. ''भारतीय वंशाचा समुदाय म्हणजे दोन्ही देशांना जोडणारा जिवंत पूल आहे. सामायिक परंपरा आणि चवींमधून हे सांस्कृतिक नाते दिसते. रोटी कॅनाई आणि मलबार परोटा, तसेच नारळ, मसाले आणि तेह तारिक - हे क्वालालंपूर आणि कोची दोन्हीकडे अगदी ओळखीचे वाटतात,'' असे मोदी म्हणाले. दोन्ही देशांचे लोक एकमेकांना चांगल्या प्रकारे समजून घेतात, कदाचित त्यांच्या भाषांमध्ये आणि मलेय भाषेत असलेल्या खूप समान शब्दांमुळे असे घडत असेल, असेही त्यांनी सांगितले. मलेशियात भारतीय चित्रपट आणि संगीत लोकप्रिय आहेत, असेही आपण ऐकल्याचे ते म्हणाले. पंतप्रधान अन्वर इब्राहिम छान गातात आणि त्यांना एम. जी. रामचंद्रन यांची तमिळ गाणीही खूप आवडतात, हेही मोदींनी सांगितले.

पंतप्रधानांनी सांगितले की मलेशियातल्या भारतीय वंशाच्या लोकांच्या मनात भारताला खास जागा आहे. २००१ मधला एक प्रसंग आठवत ते म्हणाले की गुजरातमध्ये भूकंप आला तेव्हा या समुदायातले खूप लोक मदतीसाठी एकत्र आले होते, आणि त्याबद्दल त्यांनी त्यांचे आभार मानले. ''मलेशियातल्या या समुदायाचे हजारो पूर्वज भारताला स्वातंर्त्य मिळावे म्हणून मोठे त्याग करून गेले. त्यातले अनेक जणांनी भारत कधीच पाहिलेला नव्हता, तरी ते नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या भारतीय राष्ट्रीय सेनेत सामील होणाऱ्यांमध्ये अग्रेसर होते,'' असे मोदी म्हणाले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या सन्मानार्थ मलेशियातल्या भारतीय सांस्कृतिक केंद्राला त्यांचे नाव देण्यात आले आहे, असेही त्यांनी सांगितले. मलेशियातल्या नेताजी सेवा केंद्र आणि नेताजी वेल्फेअर फाउंडेशन यांच्या कामालाही त्यांनी सलाम केला.

पंतप्रधानांनी पुन्हा सांगितले की मलेशियातल्या भारतीय वंशाच्या लोकांनी शतकानुशतके आपली परंपरा टिकवून ठेवली आहे. 'मन की बात' कार्यक्रमात आपण या समुदायाचा उल्लेख केला होता, असे आठवत ते म्हणाले की मलेशियात ५०० पेक्षा जास्त शाळांमध्ये मुलांना भारतीय भाषांमध्ये शिक्षण दिले जाते. ''तिरुवल्लुवर आणि स्वामी विवेकानंद यांसारख्या संतांचा प्रभाव मलेशियात दिसतो, आणि बातू केव्हज इथला थायपुसम उत्सव तर पालनीसारखाच दिव्य वाटतो,'' असे मोदी म्हणाले. गरबा मलेशियात लोकप्रिय आहे, असेही त्यांनी सांगितले, आणि शीख समुदायाशी असलेले सांस्कृतिक नाते भारत मनापासून जपतो, कारण हा समुदाय गुरु नानक देव यांच्या शिकवणीचा प्रचार करत आहे, असेही त्यांनी नमूद केले.

मोदी म्हणाले की 'तमिळ' ही भारताने जगाला दिलेली देणगी आहे. तमिळ साहित्य अजरामर आहे, तमिळ संस्कृती जागतिक आहे आणि तमिळ लोकांनी आपल्या कौशल्यांनी मानवतेची सेवा केली आहे. ''भारताचे उपराष्ट्रपती थिरु सी. पी. राधाकृष्णन, परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर, अर्थमंत्री निर्मला सीतारामन आणि माहिती व प्रसारण राज्यमंत्री डॉ. मुरुगन हे सगळे तमिळनाडूचे आहेत,'' असे मोदींनी ठामपणे सांगितले. पंतप्रधान म्हणाले की मलेशियातला तमिळ प्रवासी समाज वेगवेगळ्या क्षेत्रांत समाजासाठी काम करत आहे, आणि हा समाज अनेक शतकांपासून मलेशियात आहे. या इतिहासातून प्रेरणा घेऊन भारतानं मलाया विद्यापीठात तिरुवल्लुवर चेअर सुरू केली आहे आणि आता सामायिक वारसा अजून मजबूत करण्यासाठी तिरुवल्लुवर केंद्रही उघडणार आहे, असे त्यांनी सांगितले. पंतप्रधानांनी सांगितले की भारत-मलेशिया संबंध दरवर्षी नवीन उंची गाठत आहेत. पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्या २०२४ मधील नवी दिल्ली भेटीची आठवण करून देत त्यांनी नमूद केले की द्विपक्षीय संबंधांना सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीपर्यंत उन्नत करण्यात आले आहे. ते म्हणाले की दोन्ही देश आता प्रगती आणि समृद्धीच्या दिशेने भागीदार म्हणून हातात हात घालून वाटचाल करत आहेत आणि एकमेकांच्या यशाचा आनंद आपलाच मानून साजरा करत आहेत.

मोदी यांनी आठवण जागवली की चांद्रयान-३ च्या ऐतिहासिक यशाबद्दल पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी दिलेल्या शुभेच्छांनी ते भारावून गेले होते आणि भारताचे यश हे मलेशियाचे आणि आशियाचेही यश आहे, यावर त्यांनी सहमती दर्शवली. ते म्हणाले की या संबंधांचा मार्गदर्शक शब्द 'इम्पॅक्ट' आहे, ज्याचा अर्थ 'सामूहिक परिवर्तनाला चालना देण्यासाठी भारत-मलेशिया भागीदारी' असा आहे. त्यांनी संबंधांचा वेग, महत्त्वाकांक्षेची व्याप्ती आणि लोकांसाठीचे फायदे यासाठी ही भागीदारी परिणामकारक ठरल्याचे सांगत दोन्ही देश संपूर्ण मानवजातीला फायदा पोहोचवू शकतात, असे स्पष्ट केले.

पंतप्रधानांनी सांगितले की भारतीय कंपन्या मलेशियासोबत काम करण्यास नेहमीच उत्सुक राहिल्या आहेत. मलेशियातील पहिला व आशियातील सर्वात मोठा इन्सुलिन उत्पादन प्रकल्प उभारण्यातील भारताच्या भूमिकेचा त्यांनी उल्लेख केला.

# मलेशियात लवकरच भारताचा युपीआय उपलब्ध होईल : पंतप्रधान मोदींची घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

क्वालालंपूर : पंतप्रधान नरेंद्र मोदी शनिवारी (७ फेब्रुवारी) मलेशियाच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर दाखल झाले. या दौऱ्यात त्यांनी भारतीय समुदायाला संबोधित केलं. मलेशियामध्ये भारतासाठी प्रेम आणि सन्मान असल्याचं सांगत, असं स्वागत भारत कायम लक्षात ठेवेल, असं मोदी म्हणाले. भारताची यूपीआय सेवा लवकरच मलेशियात सुरू होणार असल्याची घोषणाही त्यांनी यावेळी केली.

पंतप्रधान मोदी काय म्हणाले? : पंतप्रधान मोदी म्हणाले, ''मागील वर्षी आसियान शिखर परिषदेसाठी मला मलेशियात येता आलं नव्हतं. मात्र, मी माझ्या मित्राला लवकरच येण्याचं वचन दिले होतं आणि त्या वचनाप्रमाणे आज मी इथं आहे. २०२६ मधील ही माझी पहिली परदेश यात्रा आहे. आपणा सर्वांना भेटून मला खूप आनंद होत आहे.''



मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्याशी असलेल्या मैत्रीबद्दल बोलताना मोदी म्हणाले, ''अन्वर इब्राहिम पंतप्रधान होण्यापूर्वीपासूनच आम्ही मित्र आहोत. आम्ही एकमेकांना चांगल्या प्रकारे समजतो. कदाचित यामागे आमची भाषा आणि मलय भाषेत असलेले अनेक समान शब्द कारणीभूत असतील.''

भारतीय समुदायाचं कौतुक करताना मोदी म्हणाले की, ''तुम्ही शतकानुशतके आपल्या परंपरा जपल्या आहेत, हे अत्यंत प्रशंसनीय आहे. जगातील भारतीय वंशाच्या लोकांचा दुसरा सर्वात मोठा समुदाय मलेशियात आहे. भारतीय आणि मलेशियन लोकांच्या हृदयांना जोडणाऱ्या अनेक गोष्टी आहेत.''

'विश्वास भारताचं सर्वात मजबूत चलन' : भारताच्या आर्थिक प्रगतीचा उल्लेख करताना त्यांनी सांगितलं की, ब्रिटन, यूएई, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, ओमान, युरोपीय संघ आणि अमेरिका यांच्यासोबत भारताचे व्यापार करार झाले आहेत. 'विश्वास हा भारताचं सर्वात मजबूत चलन बनलं आहे,' असंही ते म्हणाले.

गेल्या १० वर्षात भारतानं मोठा बदल पाहिला असून, ११व्या क्रमांकावरून भारत आता जगातील टॉप-३ अर्थव्यवस्थांमध्ये सामील होण्याच्या मार्गावर आहे, असंही पंतप्रधान मोदींनी नमूद केलं.

तमिळ भाषेबद्दल बोलताना पंतप्रधान म्हणाले की, ''तमिळ भाषा भारताला जगाशी जोडते. तमिळ साहित्य शाश्वत आहे आणि तमिळ संस्कृती जागतिक आहे.'' त्यांनी उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, केंद्रीय मंत्री एस. जयशंकर, निर्मला सीतारमण आणि एल. मुरुगन हे तमिळनाडूचे असल्याचंही सांगितलं. तसेच, लवकरच विद्यार्थ्यांसाठी भारतात शिक्षण घेण्यासाठी 'तिरुवल्लुवर शिष्यवृत्ती' देण्यात येणार असल्याची घोषणाही त्यांनी केली. भारतीय प्रवासी समुदाय विकसित भारताच्या प्रवासातील महत्त्वाचा भागीदार असल्याचंही मोदी यांनी अधोरेखित केलं.

'पंतप्रधान मोदी यांचं जंगी स्वागत' : यापूर्वी मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं स्वागत केलं. या कार्यक्रमात ८०० हून अधिक कलाकारांनी भरतनाट्यम, कथक, कथकली, कुचिपुडी, लावणी आणि ओडिसी यांसारख्या भारतीय शास्त्रीय व लोकनृत्यांचं सादरीकरण केलं. या नृत्यप्रदर्शनानं मलेशियन रेकॉर्ड बुकमध्ये आपलं नाव नोंदवलं. विशेष म्हणजे, मोदी आणि इब्राहिम एकाच कारनं कार्यक्रमस्थळी पोहोचले. 'भारत माता की जय' आणि 'मोदी, मोदी'च्या घोषणांच्या गजरात मोदी मंचावर आले.

'भारताचा एक चांगला मित्र' : या वेळी बोलताना अन्वर इब्राहिम म्हणाले की, ''भारताचा एक चांगला मित्र मलेशियात आमच्यासोबत सहभागी होत आहे, याचा मला वैयक्तिक आनंद आहे.'' भारत आणि मलेशियामधील प्राचीन संबंधांची आठवण करून देत त्यांनी सांगितलं की, भारत हा मलेशियाचा प्रमुख व्यापार भागीदार आहे. २०२५ मध्ये १५ लाखांहून अधिक भारतीय पर्यटकांनी मलेशियाला भेट दिली होती. ''मोदीजी आणि भारताचा मित्र असल्याचा मला अभिमान आहे,'' असेही त्यांनी नमूद केले.

# विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी व सुलभतेसाठी केंद्रीय लोक सेवा आयोगाने कॉल सेंटर सुविधेचा कालावधी वाढवला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिल्ली : सध्या सुरू असलेल्या आवेदन प्रक्रियेत उमेदवारांना मदत व मार्गदर्शन मिळणे अधिक सोयीचे व सुलभ व्हावे यासाठी केंद्रीय लोकसेवा आयोगाने त्यांच्या कॉल सेंटरच्या कामाच्या वेळा वाढवल्या आहेत.

सनदी सेवा परीक्षा २०२६ व भारतीय वनसेवा परीक्षा २०२६ साठीची आवेदने भरून होईपर्यंत हे कॉल सेंटर शनिवारी, रविवारी तसेच सर्व सुट्ट्यांच्या दिवशी कार्यरत राहणार आहे. नेहमीच्या कार्यालयीन वेळांशिवायही उरलेल्या वेळात उमेदवारांच्या मदतीसाठी दररोज सकाळी ७ वाजल्यापासून रात्री ९ वाजेपर्यंत दोन पाळ्यांमध्ये हे कॉल सेंटर कार्यरत राहील.

आवेदन प्रक्रियेसंबंधी किंवा परीक्षेसंबंधी उमेदवारांना माहिती किंवा मदत मिळताना विलंब लागू नये म्हणून कॉल सेंटरची क्षमता वाढवण्यात आली आहे.

उमेदवारांना सुविधा पुरवण्यासाठी आयोगाची वचनबद्धता अधोरेखित करताना डॉ. अजय कुमार यांनी उमेदवारांना साहाय्य करण्यासाठी केलेल्या अनेक उपाययोजनांचा एक भाग म्हणजे कॉल सेंटरची वाढीव क्षमता असल्याचे सांगितले. '' उमेदवारांना मदत मिळावी व सर्व आवश्यक सहाय्यक यंत्रणा कार्यरत राहण्यासाठी ही पावले उचलली गेली आहेत,'' असे ते म्हणाले.

आवेदकांशी संपर्क बळकट व्हावा, त्यांच्या शंकांना त्वरित उत्तरे मिळावीत व या परीक्षाचक्रातील महत्वाच्या टप्प्यावर उमेदवारांना सुरळीत सेवा मिळावी यासाठी हा उपक्रम आहे.

# देशाच्या तिजोरीने गाठला विक्रमी उच्चांक, परकीय चलन साठ्यात तब्बल १४.३६ अब्ज डॉलर्सची वाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिल्ली : भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेल्या माहितीनुसार, ३० जानेवारी रोजी संपलेल्या आठवड्यात देशाच्या परकीय चलन साठ्यात १४.३६ अब्ज डॉलर्सची वाढ होऊन तो ७२३.७७ अब्ज डॉलर्सचा सर्वकालीन उच्चांक झाला आहे. मागील आठवड्यात, एकूण परकीय चलन साठा ८.०५ अब्ज डॉलर्सने वाढून ७०९.४१ अब्ज डॉलर्सचा विक्रमी उच्चांक गाठला होता. यापूर्वी, सप्टेंबर २०२४ मध्ये परकीय चलन साठा ७०४.८९ अब्ज डॉलर्सच्या शिखरावर पोहोचला होता.

भारताच्या परकीय चलन साठ्यात सलग चौथ्या आठवड्यात वाढ झाली आहे. महत्त्वाचे म्हणजे, एका महिन्यापेक्षा कमी कालावधीत, भारताच्या परकीय चलन साठ्यात अंदाजे ३७ अब्ज डॉलर किंवा ३.३४ लाख कोटींपेक्षा जास्त वाढ झाली आहे. यामुळे देशाच्या तिजोरीत विक्रमी उच्चांक गाठला आहे. महत्त्वाचे म्हणजे, सोने हे या वाढीचे मुख्य कारण आहे, ज्यामध्ये १४.५० अब्ज डॉलर पेक्षा जास्त वाढ झाली आहे. परकीय चलन मालमत्तेत थोडीशी घट झाली असली तरी, तज्ञांचा असा अंदाज आहे की आरबीआयच्या तिजोरीतील सोने १३७ अब्ज डॉलरपेक्षा जास्त झाले आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेल्या माहितीनुसार, ३० जानेवारी रोजी संपलेल्या आठवड्यात देशाच्या परकीय चलन साठ्यात १४.३६ अब्ज डॉलर्सची वाढ होऊन तो ७२३.७७ अब्ज डॉलर्सचा सर्वकालीन उच्चांक झाला आहे. मागील आठवड्यात एकूण परकीय चलन साठा ८.०५ अब्ज डॉलर्सने वाढून ७०९.४१ अब्ज डॉलर्सचा विक्रमी उच्चांक गाठला होता. यापूर्वी, सप्टेंबर २०२४ मध्ये, परकीय चलन साठा ७०४.८९ अब्ज डॉलर्सच्या शिखरावर पोहोचला होता. महत्त्वाचे म्हणजे, देशाच्या परकीय चलन साठ्यात वाढ होण्याचा हा सलग चौथा आठवडा आहे. या चार आठवड्यात, देशाच्या परकीय चलन साठ्यात ३६.९७ अब्ज डॉलर्स किंवा ३.३४ लाख कोटींनी वाढ झाली आहे. येत्या काळात परकीय चलन साठ्यात आणखी वाढ अपेक्षित असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. केंद्रीय बँकेने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार, परकीय चलन साठ्याचा एक महत्त्वाचा घटक मानल्या जाणाऱ्या परकीय चलन मालमत्तेत ३० जानेवारी रोजी संपलेल्या आठवड्यात ४९३ दशलक्ष डॉलर्सची घट होऊन ती ५६२.३९ अब्ज डॉलर्सवर आली. डॉलरच्या संदर्भात व्यक्त होणाऱ्या परकीय चलन मालमत्तेत युरो, पौंड आणि येन यांसारख्या गैर-अमेरिकन चलनांमध्ये वाढ किंवा अवमूल्यनाचा परिणाम समाविष्ट आहे. रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे की पुनरावलोकनाधीन आठवड्यात सोन्याच्या साठ्याचे मूल्य १४.५९ अब्ज डॉलर्सने वाढून १३७.६८ अब्ज डॉलर्सवर पोहोचले आहे. विशेष रेखांकन हक्क (एीं) २१६ दशलक्ष डॉलर्सने वाढून १८.९५ अब्ज डॉलर्सवर पोहोचल्याचेही केंद्रीय बँकेने नोंदवले आहे. आकडेवारीनुसार, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (घ्श्इ) सोबत भारताची राखीव स्थिती देखील पुनरावलोकनाधीन आठवड्यात ४४ दशलक्ष डॉलर्सने वाढून ४.७४ अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे.

परकीय चलन साठ्याच्या बाबतीत भारत हा जगातील पाचवा सर्वात मोठा देश आहे, ज्याकडे ७२३ अब्ज डॉलरपेक्षा जास्त परकीय चलन साठा आहे. आकडेवारी पाहता, परकीय चलन साठ्यात भारत रशियापेक्षा फक्त १०० अब्ज डॉलरने मागे आहे. सध्या, रशियाचा परकीय चलन साठा ८२६.८० अब्ज डॉलर आहे. स्वित्झर्लंडचा परकीय चलन साठा १ ट्रिलियन डॉलरपेक्षा जास्त झाला आहे. परकीय चलन साठ्याच्या बाबतीत चीन हा जगातील सर्वात मोठा देश आहे, ज्याकडे ३ ट्रिलियन डॉलरपेक्षा जास्त आहे. त्यानंतर जपानचा क्रमांक लागतो, ज्याकडे १.३ ट्रिलियन डॉलर परकीय चलन साठा आहे.

# महापालिकेप्रमाणेच जिल्हा परिषदेतही महायुतीलाच सत्ता मिळणार, मतदान होताच केंद्रीय मंत्री खडसेंना विश्वास

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठीची मतदान प्रक्रिया आज पूर्ण झाली आहे, दिग्गजांचं भविष्य मतपेटीत बंद झालं आहे. परवा म्हणजे ९ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे. राज्यात नगरपालिका आणि महानगरपालिका मधील यशाप्रमाणेच जिल्हा परिषदेच्या निवडणुकीमध्ये देखील महायुतीला यश मिळेल असा विश्वास केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांनी व्यक्त केला आहे. राज्यातील निवडणुका सुरू असलेल्या जिल्हा परिषदेवर महायुतीची सत्ता बसेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

नगरपालिका आणि महानगरपालिका निवडणुकीमध्ये भाजप शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा परफॉर्मन्स हा चांगला राहिला आहे. त्यानुसार आता जिल्हा परिषद निवडणुकांमध्ये देखील महायुतीची सत्ता येईल असा विश्वास केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांनी व्यक्त केला आहे. जळगाव जिल्हा परिषद निवडणूक महायुती म्हणून की स्वबळावर या संदर्भात त्या वेळेची परिस्थिती बघून निर्णय घेतले जातील. मंत्री गिरीश महाजन, मंत्री गुलाबराव पाटील तसेच दोन्ही खासदार आणि त्या त्या ठिकाणचे आमदार जिल्हा परिषद निवडणूक महायुतीत लढण्यासंदर्भात निर्णय घेतील असे खडसे म्हणाल्या.

एकनाथ खडसे यांच्या अजामीनपात्र वॉरंट जारी करण्यात आल्याच्या मुद्यावर बोलताना रक्षा खडसे म्हणाल्या की, त्या संदर्भातली माहिती मला आजच सकाळी मिळाली आहे. सध्या हा विषय कोर्टात सुरू आहे. त्यामुळं जे काय आहे ते कोर्टात समोर येईल असे खडसे म्हणाले. एकनाथ खडसे यांना भोसरी प्रकरणात अजामीनपात्र वॉरंट जारी करण्यात आले आहे. दरम्यान, राज्यभरातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समित्यांसाठी आज (७ फेब्रुवारी) मतदान पार पडत आहे. जिल्हा परिषदेच्या ७३१ आणि पंचायत समित्यांच्या १ हजार ४६२ जागांसाठी मतदान होत आहे. निवडणुकीच्या रिंगणात एकूण ७ हजार ४३८ उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. जिल्हा परिषदेच्या जागांसाठी २ हजार ६२४ तर पंचायत समितीसाठी ४ हजार ८१४ उमेदवार मैदानात उतरले आहेत. या सगळ्यांचं भवितव्य आज मतपेटीत कैद होणार आहे. आज सकाळी साडेसात ते संध्याकाळी साडेपाच दरम्यान ही मतदान प्रक्रिया पार पडेल. निवडणूक आयोगाकडून आणि जिल्हा प्रशासनाकडून या मतदान प्रक्रियेची तयारी सध्या सुरु आहे. मतदानाच्या पार्श्वभूमीवर संबंधित १२ जिल्ह्यांमधील शाळा, महाविद्यालये आणि सरकारी कार्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. मतदानानंतर ९ फेब्रुवारीला मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाईल. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे पुकारण्यात आलेल्या दुखवट्यामुळे या निवडणुका ५ फेब्रुवारीऐवजी ७ फेब्रुवारीला घेण्याचा निर्णय राज्य निवडणूक आयोगाने घेतलाय. त्या अनुषंगाने आज मतदानाची रणधुमाळी होणार आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# मंदिर प्रीमिअर लीग टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सहभाग

## कोल्हापूर येथे रंगणार स्पर्धा, सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते क्रीडा साहित्याचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : मंदिर प्रीमिअर लीग टेनिस बॉल (दिवस/रात्र) क्रिकेट स्पर्धेचे आयोजन दि. १४ ते १६ फेब्रुवारी या कालावधीत शास्त्री नगर मैदान, कोल्हापूर येथे करण्यात आले आहे. सदर स्पर्धेच्या दुसऱ्या पर्वात एकूण १२ संघांनी सहभाग नोंदविला असून, यामध्ये यंदा प्रथमच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथील आस्थापनेवरील अधिकारी, कर्मचारी व पुजारी यांचा संघ सहभागी होत असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीच्या संघाचा स्वेरी कॉलेजच्या मैदानावर नियमित सराव सुरू असून, या संघातील खेळाडूंना मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते जर्सी (टी-शर्ट), बूट व इतर क्रीडा साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी पारंपरिक धोतर व नेहरू शर्ट परिधान करून मैदानावर उतरून बॉलिंग व फलंदाजी करत खेळाडूंना प्रोत्साहन दिले. त्यांच्या या सहभागामुळे उपस्थित खेळाडू व क्रीडाप्रेमींमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

मंदिर प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धेला क्रीडाप्रेमींकडून मोठ्या प्रमाणावर उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, विविध धार्मिक व सामाजिक संस्थांचे संघ या स्पर्धेत सहभागी होत आहेत. यामध्ये श्री क्षेत्र जोतिबा, श्री क्षेत्र नृसिंहवाडी, श्री क्षेत्र अंबाबाई (महालक्ष्मी), ओढ्यावरील गणपती (प. म. दे. स.), परशुराम सोशल फाउंडेशन, श्री क्षेत्र तुळजापूर, श्री क्षेत्र पंढरपूर, श्री क्षेत्र माहूरगड, श्री क्षेत्र गहिनीनाथ (औसा), श्री क्षेत्र शिर्डी तसेच श्री महालक्ष्मी (सारसबाग, पुणे) आदी संघांचा समावेश आहे.

मंदिर प्रीमिअर लीग टेनिस बॉल क्रिकेट समितीने स्पर्धेसाठी निश्चित केलेल्या आकृतीबंधानुसार एका संघामध्ये जास्तीत जास्त १४ खेळाडू असणे बंधनकारक असून, परगावातून येणाऱ्या संघांच्या खेळाडूंसाठी राहण्याची व्यवस्था स्पर्धा समितीतर्फे करण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक संघाने सामना सुरू होण्यापूर्वी किमान ४० मिनिटे आधी मैदानावर उपस्थित राहणे बंधनकारक राहील, असे नियम व अटी घालण्यात आले आहेत.

> **मंदिर प्रीमिअर लीगमध्ये यंदा प्रथमच श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीचे पुजारी, अधिकारी व कर्मचारी सहभागी होत आहेत. विठ्ठल-रुक्मिणी मंदिराच्या लौकिकाप्रमाणेच आमचे खेळाडू उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवतील, अशी मी पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना करतो.**
>
> **– गहिनीनाथ महाराज औसेकर**
> **सह-अध्यक्ष, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर**



# 'हिंद-दी-चादर' अंतर्गत जिल्ह्यात मोठ्या संख्येने विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कोल्हापूर : अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन आणि राज्यस्तरीय समागम समिती यांच्या वतीने 'हिंद-दी-चादर' अंतर्गत श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागमाचे कार्यक्रम राज्यभर राबविण्यात येत आहेत. नागपूर येथे ७ डिसेंबर २०२५ रोजी तसेच नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी शहीदी समागमाचे कार्यक्रम पार पडले. यानंतर नवी मुंबई येथे दिनांक २८ फेब्रुवारी व १ मार्च रोजी देशाचे पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री आणि राज्याचे मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला कोल्हापूर जिल्ह्यातूनही असंख्य लोक उपस्थित राहणार आहेत.

या अनुषंगाने येणाऱ्या कालावधीत शिक्षण, आरोग्य विभाग तसेच इतर शासकीय कार्यालयांनी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांचा अवलंब करून मोठ्या संख्येने विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे, अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव यांनी दिल्या.

तत्पूर्वी दूरदृश्य प्रणालीद्वारे नवी मुंबई येथील कार्यक्रमस्थळावरील सुरक्षा, पाणीपुरवठा, भोजन, निवास, वाहतूक, स्वच्छता आदी बाबींच्या व्यवस्थेबाबत मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांनी निर्देश दिले. नंतर जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत शालेय स्तरावर प्रभातफेरी, विविध स्पर्धा, आरोग्य शिबिरे, शासकीय कार्यालयांमध्ये माहितीपर बॅनर, श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनावर आधारित गाण्यांचे प्रसारण तसेच माहितीपटांचे प्रदर्शन आदी कार्यक्रम घेण्यात येणार आहेत.

महाराष्ट्र शासनाने सर्व समाजघटकांना सोबत घेऊन एक राज्यस्तरीय समिती गठित केली आहे. या समितीत शीख बांधवांसह सिकलकर, बंजारा, लबाना, मोहयाल, वाल्मिकी, उदासीन आणि भगत नामदेव वारकरी संप्रदाय अशा विविध समुदायांचा समावेश करण्यात आला आहे. यामधून शासनाने गुरु साहिबांच्या 'मानवता' या संदेशाला खऱ्या अर्थाने अधोरेखित केले आहे.

'हिंद-दी-चादर' म्हणून जगभरात ओळखल्या जाणाऱ्या या महान संतांनी केवळ धर्मासाठीच नव्हे, तर मानवी मूल्ये, धर्मस्वातंत्र्य आणि स्वाभिमानासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या या अजोड बलिदानाला ३५० वर्षे पूर्ण होत असल्याच्या ऐतिहासिक औचित्यावर महाराष्ट्र शासनाने या महापुरुषाचे स्मरण करण्यासाठी तसेच त्यांच्या त्यागाचा वारसा आधुनिक काळातील तरुण पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी एक सांस्कृतिक आणि आध्यात्मिक सेतू उभा केला आहे.

# श्री संत गजानन महाराज प्रकट दिन, दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त पंढरपुरात श्री संत गजानन महाराज मंदिरामध्ये भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

श्री संत गजानन महाराज प्रकट दिनानिमित्त मंदिरात आकर्षक विद्युत व फुलांची सजावट करण्यात आली होती प्रकट दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाची आयोजन गेले आठ दिवसापासून करण्यात येत आहे प्रकट दिनानिमित्त माजी नगराध्यक्ष दगडू धोत्रे यांच्या कार्यालय मध्ये श्री च्या मूर्तीची पूजन माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या हस्ते करण्यात आले व त्यानंतर अर्थाने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले यावेळी उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे नगरसेवक सुनील वाळुजकर अमोल डोके, सुजित सर्व ओढ माझे नगरसेवक संग्राम अभ्यंकर, दत्ता धोत्रे इब्राहिम बोरी उपस्थित होते. प्रकट दिनानिमित्त भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले श्री संत गजानन महाराज यांचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी झाली असल्याचे दिसून आले आहे.

# भारत–सेशेल्स सागरी आणि नील अर्थव्यवस्था सहकार्याला नवे बळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिल्ली : भारत आणि सेशेल्स यांच्यातील सागरी व्यापार, नील अर्थव्यवस्थेची क्षेत्रे आणि शाश्वत विकासातील सहकार्य अधिक दृढ करण्याच्या संधींबाबत इंडो-सेशेल्स बिझनेस गोलमेज चर्चा करण्यात आली. या बैठकीला सेशेल्स प्रजासत्ताकाचे राष्ट्राध्यक्ष डॉ. पॅट्रिक हर्मिनी आणि भारताचे बंदरे, जहाजवाहतूक व जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल उपस्थित होते. सर्बानंद सोनोवाल यांनी सांगितले की भारत आणि सेशेल्स यांच्यातील संबंध ऐतिहासिक असून लोकांमधील दृढ संपर्कामुळे ते अधिक बळकट झाले आहेत. आधुनिक राजकीय संबंधांपूर्वीपासून दोन्ही देशांमध्ये सागरी देवाणघेवाण सुरू होती. या भागीदारीने आज परस्पर लोकशाही मूल्ये, बहुसांस्कृतिकता आणि परस्पर सन्मान यांवर आधारित घनिष्ठ मैत्रीपूर्ण संबंधांचे स्वरूप धारण केले असून विकास सहाय्य, क्षमता विकास, शिक्षण, आरोग्यसेवा, सागरी सुरक्षा आणि आपत्ती प्रतिसाद अशा विविध क्षेत्रांमध्ये हे सहकार्य विस्तारले आहे. भारताचे सेशेल्सशी असलेले संबंध महासागर क्षेत्रांमधील सुरक्षा व विकासासाठी परस्पर सहकार्य आणि सर्वांगीण प्रगती या दृष्टिकोनावर आधारित आहेत, जो हिंद महासागर क्षेत्रात आर्थिक सहकार्य, शाश्वतता आणि सुरक्षेला प्राधान्य देतो.

''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली या भागीदारीला नवसंजीवनी मिळाली आहे. शेजारी-प्रथम धोरण, महासागराधारित सहकार्य आणि सर्वसमावेशक विकासावर त्यांचा भर सेशेल्ससह हिंद महासागरातील बेट राष्ट्रांबाबत भारताला स्पष्ट धोरणात्मक दिशा देतो. भारत आणि सेशेल्स हे दोन्ही देश हिंद महासागराला शांतता, स्थिरता आणि सामायिक समृद्धीचे क्षेत्र मानतात,'' असे सर्बानंद सोनोवाल यांनी सांगितले. ते म्हणाले की भारताचा बंदर-आधारित विकास, लॉजिस्टिक्स, सागरी सेवा आणि नवीकरणीय ऊर्जा क्षेत्रातील अनुभव सेशेल्सच्या विकास प्राधान्यांना पूरक ठरू शकतो, तर मुंबईची वित्तीय व फिनटेक परिसंस्था नवकल्पना आणि आर्थिक समावेशनाला चालना देऊ शकते. सहकार्याच्या प्रमुख क्षेत्रांचा उल्लेख करताना सर्बानंद सोनोवाल म्हणाले, ''नील अर्थव्यवस्थेमध्ये मत्स्यव्यवसाय, मत्स्यपालन, बंदर विकास, सागरी पायाभूत सुविधा, महासागराधारित नवीकरणीय ऊर्जा आणि सागरी संशोधन या क्षेत्रांत मोठी संधी आहे. पर्यटन व आदरातिथ्य, नवीकरणीय ऊर्जा, आरोग्यसेवा, औषधनिर्मिती, वित्तीय सेवा, फिनटेक, शिक्षण आणि कौशल्यविकास या क्षेत्रांतही सहकार्याची मोठी क्षमता आहे.'' या भारत-सेशेल्स उद्योगसंबंधी गोलमेज बैठकीमध्ये भारतातील पायाभूत सुविधा, बंदरे, मत्स्यव्यवसाय, आरोग्य, शिक्षण, फिनटेक आणि वाहन उद्योगातील अनेक कंपन्या सहभागी झाल्या. केंद्रीय मंत्र्यांनी सांगितले की बंदरे, लॉजिस्टिक्स जाळे, सागरी सेवा, जहाजबांधणी आणि वित्तीय परिसंस्था यांमुळे मुंबई हे भारत-सेशेल्स सागरी व्यापार आणि महासागराधारित उद्योगांसाठी एक नैसर्गिक व्यासपीठ ठरते. ''समुद्र, व्यापार आणि उद्योग यांमुळे घडलेली मुंबई शतकानुशतके भारताचा जगाशी असलेला संपर्क दर्शवते. म्हणूनच भारत आणि सेशेल्स या दोन सागरी राष्ट्रांमधील आर्थिक व व्यापारी सहकार्याबाबत चर्चा करण्यासाठी हे योग्य ठिकाण आहे,'' असे सर्बानंद सोनोवाल म्हणाले.

भारताच्या व्यापक आर्थिक प्रवासाचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की सातत्यपूर्ण देशांतर्गत मागणी, सुधारणा-आधारित धोरणाला पोषक वातावरण आणि मोठ्या प्रमाणावरील पायाभूत गुंतवणुकीमुळे भारत सध्या निर्णायक टप्प्यावर आहे. मागील दशकात करप्रणाली, कॉर्पोरेट नियमन आणि डिजिटल प्रशासनात मोठ्या सुधारणा करण्यात आल्या असून त्यामुळे पारदर्शकता आणि व्यवसाय सुलभता वाढली आहे.

''मागील ११ वर्षांत भारताची बंदर क्षमता दुप्पट झाली आहे, खलाशांची संख्या तिप्पट झाली आहे आणि समुद्री क्रूझ प्रवाशांची संख्या चौपट झाली आहे,'' असे त्यांनी सांगितले. यामुळे सेशेल्ससारख्या भागीदारांसोबत नैसर्गिक समन्वय निर्माण होतो. भारताचे तरुण व कुशल मनुष्यबळ देशाच्या विकासाचा कणा असून जागतिक भागीदारांसाठी दीर्घकालीन संधी निर्माण करते. सर्बानंद सोनोवाल म्हणाले की ऐतिहासिक मैत्री, राजकीय विश्वास, वाढती संपर्क व्यवस्था आणि सामायिक सागरी दृष्टिकोन यामुळे भारत व सेशेल्स आर्थिक भागीदारी नव्या उंचीवर नेण्यासाठी उत्तम स्थितीत आहेत. ''मुंबईपासून माहेपर्यंतचे अंतर कमी आहे आणि शक्यता मोठ्या आहेत,'' असे सांगत त्यांनी दोन्ही देशांतील उद्योगांना दीर्घकालीन आणि परस्पर फायदेशीर भागीदारी निर्माण करण्याचे आवाहन केले. भारताकडून सेशेल्सला औषधे, अन्नपदार्थ, कापड, अभियांत्रिकी उत्पादने, बांधकाम साहित्य, वाहने आणि ग्राहक वस्तू निर्यात केल्या जातात, तर भारतीय कंपन्यांनी सेशेल्समध्ये पायाभूत सुविधा, ऊर्जा प्रकल्प, बांधकाम आणि सेवा क्षेत्रात योगदान दिले आहे. मुंबई ते माहे थेट विमानसेवेने पर्यटन, व्यवसाय प्रवास आणि व्यापारी संपर्क अधिक मजबूत झाले आहेत, असे त्यांनी नमूद केले.

हा कार्यक्रम भारतीय उद्योग महासंघ (सीआयआय) आणि भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. यात दोन्ही देशांतील वरिष्ठ अधिकारी, उद्योग क्षेत्रातील अग्रणी आणि प्रतिनिधी सहभागी झाले होते. यामध्ये विजय कुमार, आयएएस (सचिव, बंदरे, जहाजवाहतूक व जलमार्ग मंत्रालय), श्याम जगन्नाथन (महासंचालक, जहाज वाहतूक), कॅप्टन बी. के. त्यागी (अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया), एम. अंगमुथू (अध्यक्ष, मुंबई बंदर प्राधिकरण), गौरव दयाल (अध्यक्ष, जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण), रोहित राठीश (सेशेल्समधील भारताचे उच्चायुक्त), एस. कुप्पुस्वामी (विशेष सल्लागार, शापूरजी पल्लोनजी) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

**विविध सामाजिक उपक्रमांनी जयंती साजरी**

# दुधनी भीम नगर येथे भीम संघर्ष मार्ग ग्रुपचे वतीने माता रमाई जयंती उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुधनी/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील दुधनी भीम नगर येथे माता रमाई जयंती मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आली. यावेळी बाबासाहेब आंबेडकर माता रमाई यांच्या प्रतिमेच्या पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी माता रमाई यांचे जीवन कार्य वर प्रकाश टाकत त्यांच्या संघर्ष त्याग आणि समाजासाठी दिलेले योगदान याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

यानंतर मान्यवर व युवकाने सामूहिक बुद्ध वंदन घेतली परिसरातील नागरिक युवक ज्येष्ठ मोठ्या संख्येने उपस्थित होते.




कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भीम संघर्ष मार्गाचे अध्यक्ष सचिन लोड्डेन वरू, सैदप्पा शिवयोगी झळकी, जय भीम बोंळूडगी शांतु, जन्ना रन्ना सिन्नूर, पिंटू लोंड्डेन, दरेप्पा शिंगे, शिवानंद मगी चंदा, दोधमनी खाजप्पा लोड्डेन, सातलिंग निंबाळ लक्षमण, मगी गुरु गायकवाड, निंगप्पा निंबाळ, विश्वस मगी, रवी धोंदमनी, शाणू शिंगे, रमेश शिंगे, महेश बसवनकेरी, उत्तम निंबाळ, संम्रट झळकी, प्रमोद झळकी, महेश झळकी,,प्रबुद्ध झलकी, गजानन बळुंडगी, भीम संघर्ष मार्ग ग्रुपचे सर्व पदाधीकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# खंडाळा (देवी) येथे माता रमाई जयंती उत्साहात साजरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : मेहकर तालुक्यातील खंडाळा देवी येथे माता रमाई आंबेडकर यांची १२८ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी परिसरातील असंख्य भीम अनुयायी उपस्थित होते.

जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिसरात भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पूजन करण्यात आले तसेच कॅन्डल लावून अभिवादन करण्यात आले. माता रमाई यांच्या सामाजिक कार्याचा, त्यागाचा व संघर्षमय जीवनाचा उपस्थितांनी आदरपूर्वक स्मरण केले.

कार्यक्रम शांतता, शिस्त व एकतेच्या वातावरणात पार पडला. समाजात बंधुता व समानतेचा संदेश देण्यात आला.

**भीम अनुयायांकडून कँडल लावून अभिवादन**

या वेळी मनीषा पडघान,, भीमराव देबाजे, दिनेश अडागळे, मधुकर देबाजे, पत्रकार गजानन राऊत, अनुसया आडगळे, धनंजय राऊत, विक्की देबाजे, सिध्दार्थ देबाजे, राजु आवचार, राधिका राऊत, सुमन देबाजे, गीता खिल्लारे, गोदावरी झरे, वंदना पोघे,सावित्रीबाई मोरे,बेबाबाई राऊत, नंदाबाई पडघान, दिलीप अंभोरे, भारत खिल्लारे, विजय अडागळे, शंकर अडागळे, अनिल वाकोडे, शरद खिल्लारे, कैलास पाईक, सचिन मोरे, दशरथ साळवे, किसना वाकुडे, आशा,वाकुडे , गंगाबाई मनवर, किसन गव्हांदे, यांच्यासह अनेक भीम अनुयायी उपस्थित होते.

# पंचायत समिती निवडणूक : मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज : निवडणूक निर्णय अधिकारी सचिन इथापे

## मतमोजणीसाठी १६ टेबल : मतमोजणीच्या होणार १९ फेऱ्या, मतमोजणीसाठी १२० अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती, सकाळी १०.०० सुरु होणार मतमोजणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ०८ गटासाठी व त्याअंतर्गत पंचायत समितीच्या १६ गणासाठी शनिवार दि.०७ फेब्रुवारी रोजी ३०९ मतदान केंद्रावर मतदान पार पडले. या निवडणूकीत एक लाख ९८ हजार ४६७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतमोजणी शासकीय धान्य गोदाम येथे सकाळी १०.०० वाजता सुरु होणार आहे. मोजणीसाठी प्रशासनाची तयारी पूर्ण झाली असून प्रशासन सज्ज असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांनी दिली. पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या ०८ गटासाठी व पंचायत समितीच्या १६ गणासाठी ६९.४४ टक्के इतके मतदान झाले असून, निवडणूकीत एक लाख ५ हजार ६५७ पुरुष तर ९२ हजार ८१० स्त्री अशा एकूण एक लाख ९८ हजार ४६७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. तसेच आतापर्यंत ६६३ टपाली मतदान झाले आहे. मतमोजणी १६ टेबल होणार असून दोन राखीव टेबल ठेवण्यात आले आहे. तर टपाली मतमोजणी गटासाठी एक टेबल व गणासाठी दोन अशा एकूण तीन टेबलवर होणार आहे. मतमोजणी प्रक्रीयेसाठी १२० अधिकारी कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी, मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांना मतमोजणी केंद्रामध्ये मोबाईल घेवून जाण्यास मनाई करण्यात आली आहे. प्रवेशद्वारावर याबाबतची तपासणी करूनच मतमोजणी केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येणार आहे. मतमोजणी केंद्र परिसरात प्रवेश करताना पोलिसांकडून प्रत्येक व्यक्तीची तपासणी केली जाणार असून अधिकृत पास असल्याशिवाय कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. मतमोजणी केंद्र परिसरात स्वतंत्र मिडिया सेंटर तयार करण्यात आले असून प्रसारमाध्यम प्रतिनिधींना याठिकाणी प्रवेश दिला जाणार आहे. प्रसार माध्यम प्रतिनिधींना सुध्दा केवळ मिडीया सेंटरमध्येच मोबाईलचा वापर करता येईल अशा सूचनाही निवडणूक निर्णय अधिकारी श्री. इथापे यांनी दिल्या. प्रत्येक टेबलवरील मतमोजणी व्हिडीओ चित्रीकरण करण्यासाठी



सी.सी. टिव्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली असून, मतमोजणी केंद्रात व्हिडीओ चित्रीकरण करणारे फिरते पथकेही कार्यरत राहणार आहेत. मतमोजणी प्रक्रिया शासकीय धान्य गोदाम, पंढरपूर येथे सोमवार दि. ०९ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.०० वाजता सुरू होणार आहे. मतमोजणी व्यवस्था, निकाल संकलनासाठी आवश्यक व्यवस्था, स्ट्रॉगरुमवर देखरेख, संकलन आदीबाबतचे निवडणुक नियुक्त अधिकारी-कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले असल्याची माहिती सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

# विक्रमी मतदान झाले, विजय कोणाचा याकडे पंढरपूर तालुक्याचे लक्ष लागले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यात जिल्हा परिषद व पंचायत समितीसाठी शनिवारी मतदान घेण्यात आले. विक्रमी ६९% मतदान झाले असल्याचे दिसून आले. मतदान विक्रमी झाले. मतमोजणी सोमवारी उद्या करण्यात येणार आहे. कोण विजयी होणार याकडे संपूर्ण तालुक्याची लक्ष लागले आहे.

हमारे चार वर्षानंतर पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणूक झाली त्यामुळे या निवडणुकीमध्ये उमेदवार मिळावी यासाठी अनेकांनी प्रयत्न केले होते. जिल्हा परिषद आठ गटासाठी ४६ तर पंचायत समितीच्या १६ जागेसाठी ७० उमेदवार रिंगणात होती.

यावर्षी प्रथम भारतीय जनता पक्षाने आपल्या प्रतिकृतीची निवडणूक केलेली होती. सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी प्रचाराची धुरा सांभाळली होती. आमदार समाधान आवताडे, माजी आमदार प्रशांत परिचारक, सहकार शिरोमणी चे चेअरमन कल्याणराव काळे, गणेश पाटील युवराज पाटील यांनी सहभाग घेतला होता. ही निवडणूक अटीतटीची झाली असल्याचे दिसून आले आहे.

निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी प्रशासनाने ३०१ मतदान केंद्र उभी केली होती. मग दोन लाख ८५ हजार ८२७ मतदारांपैकी एक लाख ९६ हजार ९७० मतदारांनी मतदाराचा हक्क बजावला. चांगली मतदान झाले व मतमोजणी उद्या सोमवारी करण्यात येणार आहे व कोण विजयी होणार याकडे मतदारांची लक्ष लागले आहे. गटनिहाय झालेले मतदान, करकंब ७७%, भोसे ७३%, कासेगाव बहात्तर टक्के, वाखरी ७५%, गोपाळपूर ६६%, भाळवणी ६६%, टाकळी ६५ टक्के मतदान झाले आहे. पंचायत समितीच्या गणामध्ये चांगले मतदान झाले जी दिसून आले आहे. एकंदरीत त यंदाच्या निवडणुकीमध्ये मतदारांनी चांगला सहभाग घेतल्याची दिसून आले आहे.

# स्वेरीमध्ये नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती साजरी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूरः गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरा करण्यात आली. त्या सोबतच 'संकल्प विद्यार्थी क्लब'चे उदघाटन आणि लोगो अनावरण हे ही कार्यक्रम पार पडले. या कार्यक्रमांसाठी प्रमुख पाहुणे म्हणून एबीएलइएस इंडिया चे संस्थापक अमोल दिक्षित हे लाभले होते.

सुरवातीला नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर संकल्प विद्यार्थी क्लबचे अध्यक्ष रोहित पाटील यांनी क्लबची संकल्पना व उद्दिष्टे याबाबत सविस्तर माहिती दिली. क्लब अंतर्गत पीएलसी-स्काडा, पायथॉन, लॅटेक्स, एचटीएमएल, सीएसएस यांसारखे विविध तांत्रिक कोर्सेस विभागामार्फत राबविण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी सुरू केलेला हा क्लब ज्ञानप्रसाराचा मंच असल्याचे त्यांनी नमूद केले. या उपक्रमांतर्गत इंजिनिअरिंगच्या तृतीय वर्षातील विद्यार्थी द्वितीय वर्ष व तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना आपले ज्ञान व कौशल्ये याबाबत माहिती देणार आहेत. संकल्प क्लबच्या लोगोच्या अंतिम निवडीसाठी आयोजिलेल्या स्पर्धेत इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागातील द्वितीय वर्षात शिक्षण घेणाऱ्या रिद्धी कुर्डे या विद्यार्थिनीने केलेला लोगो अंतिम म्हणून स्वीकारण्यात आला. प्रमुख पाहुणे अमोल दीक्षित यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी संदेश दिला. त्यानंतर डॉ. यशपाल खेडकर यांनीही नेताजींच्या कार्यावर प्रकाश टाकला. उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांनी संकल्प विद्यार्थी क्लब या उपक्रमाचे कौतुक करून हा क्लब भविष्यातही यशस्वीपणे कार्यरत रहावा अशी अपेक्षा व्यक्त केली. विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम. एस. मठपती, उप- विभागप्रमुख प्रा.महुआ बिस्वास, संकल्प विद्यार्थी क्लबच्या समन्वयक प्रा. प्राजक्ता तुपारे, तसेच प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाच्या विभागप्रमुख डॉ. नीता कुलकर्णी- तळवलकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

# घोटी केंद्रावरील एच.एस.सी परीक्षेची आसन व्यवस्था जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर प्रतिनिधी/सोमनाथ गिरी : घोटी येथील मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या जनता विद्यालय व ज्युनिअर कॉलेज घोटी ता - इगतपुरी जि.नाशिक या विद्यालयात एच.एस.सी.परीक्षेसाठीची केंद्र आसन व्यवस्था जाहीर करण्यात आली आहे.

जनता विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय घोटी . केंद्र क्रमांक ३२१ असून दि.१० फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होणाऱ्या परीक्षेसाठी एकूण ५८७ विद्यार्थी प्रविष्ट आहे. जनता विद्यालयात बैठक क्रमांक - ड -११८६९७ ते ड १६२९५५ पर्यंत अशी एकूण ४५० विद्यार्थ्यांची आसनव्यवस्था सर्व विषयासाठी करण्यात आली आहे.या केंद्रात जनता विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय घोटी, न्यु इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज आहुर्ली, आदर्श कन्या विद्यालय घोटी , उच्च माध्यमिक विद्यालय गोंदे तसेच वाघेरे येथील उच्च माध्यमिक विद्यालय या शाळा समाविष्ट आहे. तसेच उपकेंद्र आदर्श कन्या विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय घोटी या उपकेंद्रात आसन क्रमांक ड -१६२९५६ ते १७१४४७ ड पर्यन्त अशी १३७ विद्यार्थ्यांची आसन व्यवस्था केलेली आहे.

अशी माहिती जनता विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय घोटीचे उपमुख्याध्यापक व केंद्र क्रमांक ० ३२१ चे केंद्रसंचालक उल्हास पवार यांनी दिली आहे.

संबंधित संलग्न शाळेतील परीक्षार्थींचा समावेश या केंद्रात आहे.

परीक्षा सुरू होण्यापूर्वी सकाळी १० वाजता परीक्षा केंद्रात हजर रहावे. सोबत फक्त लेखन साहित्य व पाणी बॉटल आणावे. सोबत दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे असे आव्हान जनता विद्यालय व ज्युनिअर कॉलेज घोटीचे प्राचार्य नितीन भामरे,केंद्र संचालक उल्हास पवार यांनी केले आहे.

# संशोधनातून सिद्धतेकडे : ३.५ वर्षांच्या अथक परिश्रमातून 'डॉ. प्रदीप जावळे' यांची यशस्वी पीएच.डी. वाटचाल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : अतिशय वेगळ्या विषावर डोमेन वाहन उद्योगातील आवाज व कंपन कमी करण्याचे तंत्रज्ञान (utomotive Noise Vibration Reduction)या संशोधन प्रबंधामध्ये वाहन उद्योगासाठी उपयुक्त अशा व्हायब्रो-ॲकौस्टिक साहित्यांचा (Vibro-coustic Materials) अभ्यास व विकास करण्यात आला आहे. ही साहित्ये कंपन शोषून घेण्यास तसेच आवाज कमी करण्यास मदत करतात.हा प्रबंध ऑटोमोटिव्ह क्षेत्रातील आवाज व कंपन नियंत्रणासाठी प्रभावी, नाविन्यपूर्ण आणि व्यवहार्य व्हायब्रो-ॲकौस्टिक साहित्य उपाय सादर करतो. भविष्यातील शांत, सुरक्षित आणि आरामदायी वाहनांच्या विकासासाठी हे संशोधन महत्त्वपूर्ण ठरते अशा संशोधन शोध डॉ प्रदीप जावळे यांनी लावला आहे.

संशोधन,चिकाटी आणि सातत्यपूर्ण मेहनतीचा गौरवशाली प्रवास यशस्वी टप्प्यावर पोहोचला आहे. अवघ्या ३.५ वर्षांच्या कालावधीत पीएच.डी.चा डिफेन्स यशस्वीरीत्या पूर्ण करून प्रदीप जावळे यांनी आपल्या नावापुढे 'डॉ.' ही मानाची उपाधी प्राप्त केली आहे. हा प्रवास केवळ शैक्षणिक यशाचा नाही, तर जिद्द,आत्मविश्वास आणि ज्ञानसाधनेचा प्रेरणादायी अध्याय ठरला आहे.या संशोधन काळात त्यांनी उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी करत ३ पेटंट्स, २ आंतरराष्ट्रीय जर्नल पेपर्स आणि ४ कॉन्फरन्स पेपर्स प्रकाशित केले. ही कामगिरी त्यांच्या संशोधनातील नावीन्य, व्यावहारिक दृष्टिकोन आणि सखोल अभ्यासाचे द्योतक आहे.अनेक आव्हाने, दीर्घ अभ्यासतास, प्रयोगांची शिस्त आणि मार्गदर्शकांचे मोलाचे मार्गदर्शन यांमधून घडलेली ही वाटचाल आज यशस्वी ठरली आहे. या यशामागे कुटुंबीयांचा पाठिंबा, मित्रांचा विश्वास आणि स्वतःवरील अढळ श्रद्धा यांचे मोलाचे योगदान आहे.आज हा क्षण केवळ वैयक्तिक आनंदाचा नसून, तर नव्या संशोधकांसाठी प्रेरणा देणारा आहे. आता संशोधनाच्या नव्या दालनांकडे वाटचाल सुरू झाली असून, ज्ञानसेवेच्या माध्यमातून समाजासाठी भरीव योगदान देण्याचा निर्धार अधिक दृढ झाला आहे.

ग्रामीण भागातील तरुण सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील वागदरी गावाचे सुपुत्र शालेय शिक्षण वागदरी गावात झाल्यावर अनेक वर्षांपासून पुण्यात मोठ्या कंपनीत महत्त्वाच्या पदांवर कार्यरत आहे. वडील दिनकर जावळे सर वागदरीत अनेक वर्षे आदर्श शिक्षक म्हणून काम पाहिले आहेत अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने मुलांना घडविले आहेत आदर्श सुसंस्कृत शिक्षक म्हणून आजही त्यांचे नाव आदराने घेतले जाते जावळे सरांनी आपल्या मुलांना घडविले आहेत.त्याच्या लहान मुलांनी पीएचडी पूर्ण केली आहे खरोखरच कौतुकास्पद बाब आहे.

**आज आनंद साजरा करण्याची वेळ आहे -**

डॉ. प्रदीप जावळे यांना या भव्य यशासाठी मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील शैक्षणिक व संशोधन वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

## वेदमूर्ती गुड्डय्या स्वामी, राजशेखर शिवाचार्य महास्वामीजी, बसवलिंग महास्वामीजी यांची उपस्थिती

## भक्तांची दर्शनासाठी गर्दी

# अक्कलकोट येथे श्री दक्षिणमुखी हनुमान मूर्तीची विधीवत प्राणप्रतिष्ठापना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



अक्कलकोट : तीर्थक्षेत्र अक्कलकोट शहरातील कोहिनूर मंगल कार्यालय परिसरातील दिशा विहार मध्ये नव्याने उभारण्यात आलेल्या श्री दक्षिणमुखी हनुमान मूर्तीची वेदमूर्ती गुड्डय्या स्वामी यांच्या विविध मंत्रोच्चारात हुबळी मठाचे मठाधिपती श्री राजशेखर शिवाचार्य महास्वामीजी व श्री बसवलिंग महास्वामीजी यांच्या हस्ते विधीवत प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. शहरासह लोकमंगल विहार परिसरातील हजारो भाविक यावेळी उपस्थित होते.

लोकमंगल विहार परिसरात श्री स्वामी समर्थ महाराज व श्री मंगलदास आश्रम असून, येथे नियमितपणे विविध धार्मिक उपक्रम होतात. वेदमूर्ती श्री रुद्रय्या स्वामी महाराज यांच्या पुढाकाराने सदरची मंदिर लोकवर्गणीतून अवघ्या दहा महिन्यात उभारण्यात आले असून, येथे श्री हनुमान मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली आहे. यानिमित्त मागील आठवडाभरापासून विविध धार्मिक कार्यक्रम येथे उत्साहात झाले. या परिसरातून श्री हनुमान मूर्तीची व कळसारोहण शोभायात्राही काढण्यात आली होती. शोभायात्रेत पुरवंत यांचे खेळ सादर करण्यात आले होते. ठिकठिकाणी फटाक्यांची आतषबाजी व फुलांच्या वर्षावाने शोभायात्रेचे स्वागत करण्यात आले. विविध भक्तीगीते सादर केली गेली. मिरवणुकीत सहभागी असलेले हनुमान मूर्ती व कळसारोहण यांना फुलांच्या माळा घालून भाविकांनी दर्शन घेतले. दोन तास निघालेल्या शोभायात्रेचे या परिसरात मुख्य रस्त्यावरून मार्गक्रमण होवून दक्षिणमुखी हनुमान मंदिराजवळ समारोप झाला.

दुसऱ्या दिवशी मूर्ती प्रतिष्ठापना व कळसारोहण उत्सव विधिवत होमहवनाने झाला. त्यानंतर श्री राजशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली.

यावेळी महास्वामीजी यांची धर्मसभा संपन्न झाली.

शेवटी उपस्थित हजारो भाविकांना उद्योगपती सिध्दाराम टाके यांच्या लोकमान्य सुपर बझार तर्फे खिरीचा महाप्रसाद वाटप करण्यात आले.

**श्री वटवृक्ष दक्षिणमुखी हनुमान मंदिराच्या उभारणीसाठी परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात देणगी दिली आहे. विशेष म्हणजे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले महाराज यांनी लाखो रुपयांची श्री हनुमान मूर्ती भेट दिली आहे. तर कळस सेवा माजी सैनिक अनिल हत्ते यांनी केले आहे. यामुळे परिसरातील नागरिकांतून कौतुक व्यक्त होत आहे.**

यावेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी, नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी, उपनगराध्यक्ष बंटी राठोड, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले, सचिव श्याम मोरे, श्री स्वयंभू गणेश मंदिराचे ओंकार ग्रामोपाध्ये, उद्योगपती विलास कोरे, एजाज मुत्तवली, भिमाशंकर कुंभार, प्रथमेश इंगळे, सुनील गोरे, उरुजपाशा पिरजादे, शिवाजी लोखंडे, विक्रम हर्डीकर, सचिन स्वामी, इंजिनियर महेश शेडम व गुरु पोतदार, उषा हंचाटे, नगरसेविका भागुबाई कुंभार, अमृता शिंदे, नगरसेवक अविनाश मडिखांबे, नन्नु कोरबू, लक्ष्मीकांत धनशेट्टी, आनंद चौगुले, अशोक जाधव, रुद्रय्या स्वामी, निनाद डांगे आदींसह परिसरातील शेकडो भाविक उपस्थित होते. सूत्रसंचालन विरुपाक्ष कुंभार यांनी केले.

सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी करेप्पा रोवली, रमेश शिंदे, गुरुशांत कुंभार,नागराज व बसवराज कुंभार, शांतविरप्पा दसले, दिगंबर साळुंखे, अविनाश कोरे, वेदेश गुरव, गुरु कुंभार, सुनिल आळंद, मल्लिकार्जुन पाटील, सचिन डिग्गे, सचिन जरीपटके, सुनिल जमादार, बसवराज अगरखेड, अनिल शिंदे, प्रणव शेटे, शंकर माळी, विरेश कुंभार व मंदिर पंच कमिटीने परिश्रम घेतले.